CNR-MHDH05-001024-2017

नियमीत दिवाणी दावा क्र. ५५/२०१७
सुपडू + ९ – विरुध्द – संतोष + ४

## निशाणी क्र. ५६ वर आदेश
## (पारित दिनांक १७.०४.२०२३)

प्रतिवादी यांचा अर्ज व त्यावरील वादी यांचे खुलाशाचे अवलोकन केले. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

**अर्ज :**

२. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांच्यातर्फे दस्तावेज दाखल करणेकामी दाखल करण्यात आला आहे. प्रतिवादी यांचे थोडक्यात कथन की, त्यांना काही महत्वाचे कागदपत्र दाखल करावयाचे आहे, ते दाखल करण्यास परवानगी मिळावी, अशी त्यांनी विनंती केली.

**खुलासा :**

३. प्रस्तुतच्या अर्जावर वादी यांच्यातर्फे हरकत घेण्यात आली. प्रतिवादी यांनी केवळ सन १९४९–५० चा प्रस्तुतचा उतारा दाखल केलेला आहे. त्या पुढील उतारे दाखल केलेले नाहीत. सबब अर्ज नामंजुर करण्यात यावा, अशी त्यांनी विनंती केली.

४. युक्तीवाद ऐकून घेऊन प्रकरणाचे अवलोकन केले. दावा हा घोषित

होऊन मिळणेसाठी, वाटणीसाठी व निरंतरच्या मनाई हुकूमासाठी दाखल करण्यात आलेला आहे. यामध्ये प्रतिवादी यांनी कैफियत दाखल केलेली आहे. तसेच माझे सन्मानीय पुर्वाधिकारी यांनी नि.क्र. ३४ अन्वये दिनांक १८.०३.२०२१ रोजी वादमुद्दे निश्चित केलेले आहेत. वादी यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र. ३५ अन्वये अभिलेखावर दाखल आहे.

**५.** वादी यांचा अधिकचा सरतपास हा दिनांक ०१.०४.२०२२ रोजी पुर्ण झालेला आहे. प्रतिवादी यांचे तोंडी विनंती अन्वये प्रकरण हे तहकूब करण्यात आले होते. त्यानंतर प्रतिवादी यांचेतर्फे अनुक्रमे नि.क्र. ५३, ५४, ५५ अन्वये मुदतीचा अर्ज दाखल करण्यात आले. सदरचे अर्ज न्यायालयाने मंजुर केले.

**६.** त्यानंतर प्रतिवादी यांचेतर्फे प्रस्तुत अर्ज दाखल करण्यात आला आहे. दिवाणी प्रक्रीया संहितेचे आदेश १३ अन्वये दस्तावेज हे दाखल करता येऊ शकते. यामध्ये वाद मुद्दे निश्चित करण्याआधी वादी व प्रतिवादी यांनी दावा व लेखी जबाब दाखल करतेवेळी दस्तावेज दाखल करणे गरजेचे आहे. परंतु तसे न झाल्यास अन्य पक्षकारांच्या साक्षीदारांच्या उलट तपासणी करीता सादर केलेल्या किंवा एकाद्या साक्षीदाराला त्याच्या स्मृतीला उजाळा देण्यासाठी दस्तावेज हे दाखल करु शकतात. परंतु प्रकरणात वादी यांचा उलट तपास हा अपुर्ण आहे. परंतु प्रतिवादी यांचे कथन आहे की, त्यांना काही दस्तावेज दाखल करावयाचे आहे. दस्तावेज दाखल केल्यास

कोणत्याही पक्षकारांचे नुकसान होणार नाही. त्यामुळे अर्ज हा दावा गुणवत्तेवर निकाली काढण्यासाठी व न्यायाच्या दृष्टीने मंजुर करावा असे मला वाटते. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**: आदेश :**

**१.** अर्ज हा मंजुर करण्यात येतो.

**२.** प्रतिवादी यांना फक्त दस्तावेज दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

Digitally signed by RAJU BHASKAR DOLE
Date: 2023.04.17 17:04:36 +0530

साक्री. **( रा.भा. डोळे )**

दिनांक : १७.०४.२०२३. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, साक्री

**: प्रमाणपत्र :**

मी प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय / आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव – मयुर योगेंद्र जाधव.

न्यायालयाचे नांव – सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, साक्री.

पी.डी.एफ. अपलोड केल्याचा दिनांक – १७.०४.२०२३.

स्वाक्षरीत/–

लघुलेखक श्रेणी –३